महासत्ता एकच आवृत्ती 25 DEC 2021

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# कला ही कलावंतांना सिध्द करते

## ■ डॉ.बलकवडे ;जिल्हास्तरीय युवा महोत्सवाचा शुभारंभ ■

कोल्हापूर,ता.२५(प्रतिनिधी)–
..............................
कला ही माणसाला उपजत लाभलेली अमूल्य देणगी असून कला ही कलावंताला सिद्ध करते, रसिकाला मंत्रमुग्ध करते.तसेच परस्परांमध्ये संघ भावना वृद्धिंगत करून एकमेकांच्या कला गुणांचा आदर करण्याचा संस्कार रुजविते, असे प्रतिपादन महापालिका प्रशासक डॉ. कादंबरी बलकवडे यांनी केले.

शिवाजी विद्यापीठआयोजित न्यू कॉलेज येथे जिल्हास्तरीय ४१ व्या युवा महोत्सवाच्या उद्‌घाटनप्रसंगी त्या बोलत होत्या. प्रमुख पाहुणे म्हणून हुतात्मा उद्योग व शिक्षण समूहाचे अध्यक्ष वैभव नायकवडी, शिवाजी विद्यापीठाच्या विद्यार्थी विकास विभागाचे संचालक डॉ.आर.व्ही. गुरव हे होते. अध्यक्षस्थानी श्री प्रिन्स शिवाजी मराठा बोर्डींग हाऊसचे चेअरमन के.जी. पाटील हे होते.

विद्यार्थ्यांच्या जडणघडणीमध्ये शैक्षणिक वाटचालीबरोबरच विविध सांस्कृतीक कलागुणांचा मोठा वाटा असतो. या कला गुणांमुळे विद्यार्थ्यांच्या भावी जीवनात आत्मविश्वास, प्रतिष्ठा प्राप्त होते तसेच विद्यार्थी अभिरुची संपन्न होतो, सुजाण नागरिक बनण्याकडे प्रवास सुरू होतो, त्यामुळे विद्यार्थ्यांनी शैक्षणिक वाटचालीबरोबरच अंगभूत कलागुणांना वाव द्यावा असे आवाहनही डॉ. बलकवडे यांनी केले. विद्यार्थी विकास विभागाचे संचालक डॉ.आर.व्ही. गुरव यांनी कलावंत विद्यार्थ्यांचा सांस्कृतिक , आर्थिक व सामाजिक विकास घडवून आणण्यासाठी विद्यापीठ कटिबद्ध असल्याचे सांगितले. वैभव नायकवडी याप्रसंगी बोलताना म्हणाले,न्यू कॉलेजच्या सुवर्ण महोत्सवी वर्षानिमित्त विद्यापीठाने जिल्हास्तरीय युवा महोत्सवाच्या आयोजनाची संधी महाविद्यालयास देऊन त्यांचा सन्मान केला आहे.

स्वागत व प्रास्ताविक प्राचार्य डॉ. व्ही. एम. पाटील यांनी केले तर आभार उपप्राचार्य डॉ. ए. एम. शेख यांनी मानले. कोल्हापूर जिल्हा युवा महोत्सवामध्ये ५६ महाविद्यालयातील ९६४ विद्यार्थी विविध १४ कला प्रकारात सहभागी झाले आहेत. न्यू कॉलेजने कोरोनाच्या पार्श्वभूमीवर योग्य ती खबरदारी घेऊन या युवा महोत्सवाचे आयोजन केले आहे.

कार्यक्रमासाठी विविध महाविद्यालयाचे विद्यार्थी, संघ प्रमुख, परीक्षक, विद्यार्थी विकास मंडळाचे अधिकारी, श्री प्रिन्स शिवाजी मराठा बोर्डिंगचे चेअरमन, व्हाईस चेअरमन, संचालक, पदाधिकारी, प्राध्यापक, कर्मचारी उपस्थित होते.

पुढारी

# कला परस्परांमध्ये संघभावना रुजवते : डॉ. कादंबरी बलकवडे

**कोल्हापूर : पुढारी वृतसेवा**

कला ही माणसाला उपजत लाभलेली अमूल्य अशी देणगी आहे. माणूस आदीम काळापासून मुक्तपणे कलागुणांची उधळण करीत आला आहे. कला कलावंताला सिद्ध करते, रसिकाला मंत्रमुग्ध करते, त्याला आनंद देत दुःखाचा विसर पाडायला भाग पाडते. कला परस्परांमध्ये संघभावना वृद्धिंगत करून एकमेकांच्या कलागुणांचा आदर करण्याचा संस्कार रुजवते, असे प्रतिपादन महापालिका प्रशासक डॉ. कादंबरी बलकवडे यांनी केले.

न्यू कॉलेज येथे शिवाजी विद्यापीठ आयोजित कोल्हापूर जिल्हास्तरीय ४१ व्या युवा महोत्सवाच्या उद्घाटनप्रसंगी त्या बोलत होत्या. याप्रसंगी हुतात्मा उद्योग व शिक्षण समूह वाळवाचे अध्यक्ष वैभव नायकवडी, श्री प्रिन्स शिवाजी बोर्डिंग हाऊसचे चेअरमन के. जी. पाटील, विद्यापीठ विद्यार्थी विकास विभागाचे संचालक डॉ. आर. व्ही. गुरव आदी उपस्थित होते. प्रास्ताविक प्राचार्य डॉ. व्ही. एम. पाटील यांनी केले. उपप्राचार्य डॉ. ए. एम. शेख यांनी आभार मानले.

पुढारी



कोल्हापूर विभागाचे माहिती उपसंचालक डॉ. संभाजी खराट यांचे स्वागत करताना पद्मश्री डॉ. ग. गो. जाधव पत्रकारिता अध्यासनाचे समन्वयक डॉ. शिवाजी जाधव. शेजारी माहिती सहायक एकनाथ पोवार, सहायक संचालक फारूख बागवान.

# डॉ. ग. गो. जाधव पत्रकारिता अध्यासनाला डॉ. खराट यांची भेट

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

महाराष्ट्र शासनाच्या माहिती व जनसंपर्क महासंचालनालयाच्या कोल्हापूर विभागीय माहिती कार्यालयाचे उपसंचालक डॉ. संभाजी खराट यांनी शिवाजी विद्यापीठाच्या पद्मश्री डॉ. ग. गो. जाधव पत्रकारिता अध्यासनाला सदिच्छा भेट दिली. अध्यासनाचे समन्वयक डॉ. शिवाजी जाधव यांनी ग्रंथ भेट देऊन त्यांचे स्वागत केले. याप्रसंगी सहायक संचालक फारूख बागवान, माहिती सहायक एकनाथ पोवार, छायाचित्रकार रोहित कांबळे उपस्थित होते.

डॉ. खराट यांनी ग. गो. जाधव पत्रकारिता अध्यासनातर्फे सुरू असलेल्या विविध उपक्रमांचे कौतुक केले. बदलत्या काळाची गरज ओळखून सुरू केलेल्या डिजिटल पत्रकारिता अभ्यासक्रमाबद्दल त्यांनी समाधान व्यक्त केले. यापुढील काळात अध्यासनाने सत्यशोधक पत्रकारितेवर संशोधन करावे, अशी अपेक्षा व्यक्त केली.

डॉ. खरात यांनी पत्रकारिता व जनसंज्ञापन अधिविभागाला भेट दिली. विभागप्रमुख प्रा. डॉ. निशा पवार यांनी त्यांचे स्वागत केले. यावेळी डॉ. सुमेधा साळुंखे उपस्थित होत्या. विद्यापीठाच्या जनसंपर्क कक्षाला त्यांनी भेट दिली. यावेळी जनसंपर्क अधिकारी डॉ. आलोक जत्राटकर यांनी स्वागत केले.

25 DEC 2021
पुण्यनगरी
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# प्राथमिक शाळा बंदला पालक जबाबदार

## कुलगुरू : डॉ. डी. टी. शिर्के : गडहिंग्लज येथे विरंगुळा केंद्र, हॉल, शाळा इमारतीचे उद्घाटन

**गडहिंग्लज : प्रतिनिधी**

शहर भौतिक विकासाबरोबरच नगरपरिषदेने प्राथमिक शाळा बांधली ही बाब कौतुकास्पद आहे. जिल्हा परिषदेच्या, नगरपरिषदेच्या शाळा टिकल्या पाहिजेत. या प्राथमिक शाळा बंद पाडण्यास पालकच जबाबदार आहेत. शाळेची प्रगती ही विद्यार्थ्यांच्या यशावर अवलंबून असते, असे प्रतिपादन कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांनी केले.

गडहिंग्लज नगरपरिषदेमार्फत बांधण्यात आलेल्या ज्येष्ठ नागरिक विरंगुळा केंद्र, सरस्वतीनगर येथील क्लब हॉल व दिनकरराव शिंदे मास्तर विद्यालय इमारत उद्घाटनप्रसंगी आयोजित कार्यक्रमात ते बोलत होते.



गडहिंग्लज : विद्यालय इमारतीचे उद्घाटन करताना खा. संजय मंडलिक, कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, श्रीपतराव शिंदे, स्वाती कोरी आदी.

यावेळी खासदार संजय मंडलिक यांच्या हस्ते नूतन इमारतीचे उद्घाटन करण्यात आले. यावेळी गोडसाखर सुरू केल्याबद्दल ॲड. श्रीपतराव शिंदे यांचा शेतकऱ्यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. नगराध्यक्षा स्वाती कोरी यांनी स्वागत करून विविध उपक्रमांची माहिती दिली.

डॉ. शिर्के म्हणाले, समाजात चांगली कामे करणारी माणसे घडणे गरजेचे आहे. दिनकरराव शिंदे यांचे शैक्षणिक क्षेत्रातील कार्य दिशादर्शक आहे. शैक्षणिक क्षेत्रात दिनकरराव शिंदे मास्तर असे शाळेचे नाव देऊन त्यांचा सन्मान नगरपरिषदेने केला आहे. शिक्षण व्यवस्था बळकट झाली तरच देशाचा विकास होऊन देश बळकट होतो.

खासदार संजय मंडलिक म्हणाले, नगरविकासमंत्री एकनाथ शिंदे यांच्या माध्यमातून गडहिंग्लजच्या विकासकामांना निधी दिला आहे. गोरगरीब विद्यार्थ्यांच्या शिक्षणासाठी नगरपरिषद व जिल्हा परिषदेच्या शाळा टिकल्या पाहिजेत, तरच ग्रामीण भागातील मुले, मुली शिकू शकतील, असे सांगितले.

यावेळी उपनगराध्यक्ष महेश कोरी, राजन गवस, डॉ. जयसिंगराव पवार यांनी मनोगत व्यक्त केले. कार्यक्रमास मुख्याधिकारी नागेंद्र मुतकेकर, बसवराज खणगावे, रामकुमार सावंत, बाळेश नाईक, विजय शिंदे, सुरेश कुराडे, उदय कदम, सुनीता पाटील, वीणा कापसे, नितीन देसाई, नरेंद्र भद्रापूर, शशिकला पाटील, शकुंतला हातरोटे यांच्यासह मान्यवर उपस्थित होते. विठ्ठल देसाई यांनी सूत्रसंचालन केले. बी. एल. कांबळे यांनी आभार मानले.

25 DEC 2021

पुण्यनगरी

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# कला आदर करण्याचा संस्कार रुजवते

## डॉ. कादंबरी बलकवडे : जिल्हास्तरीय ४१ व्या युवा महोत्सवाचे उदघाटन

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

कला कलावंताला सिद्ध करते. रसिकाला मंत्रमुग्ध करते. त्याला आनंद देत दुःखाचा विसर पाडायला भाग पाडते. कला परस्परांमध्ये संघभावना वृद्धिंगत करून एकमेकांच्या कलागुणांचा आदर करण्याचा संस्कार रुजविते, असे प्रतिपादन महापालिकेच्या प्रशासक डॉ. कादंबरी बलकवडे यांनी न्यू कॉलेज येथे शिवाजी विद्यापीठ आयोजित कोल्हापूर जिल्हास्तरीय ४१ व्या युवा महोत्सवाच्या उद्घाटनप्रसंगी केले.



कोल्हापूर : न्यू कॉलेज येथे शिवाजी विद्यापीठ आयोजित जिल्हास्तरीय ४१ व्या युवा महोत्सवाच्या उद्घाटनप्रसंगी प्रशासक डॉ. कादंबरी बलकवडे. सोबत अन्य मान्यवर.

डॉ. बलकवडे म्हणाल्या, कला ही माणसाला उपजत लाभलेली अमूल्य अशी देणगी आहे. माणूस आदिम काळापासून मुक्तपणे आपल्या कलागुणांची उधळण करत आला आहे. विद्यार्थ्यांच्या जडणघडणीमध्ये शैक्षणिक वाटचालीबरोबरच विविध सांस्कृतिक कलागुणांचा मोठा वाटा असतो. या कलागुणांमुळे विद्यार्थ्यांच्या भावी जीवनात आत्मविश्वास, प्रतिष्ठा प्राप्त होते. विद्यार्थी अभिरूची संपन्न होतो व सुजाण नागरिक बनण्याकडे प्रवास सुरू होतो. यामुळे विद्यार्थ्यांनी शैक्षणिक वाटचालीबरोबरच अंगभूत कलागुणांना वाव द्यावा.

शिवाजी विद्यापीठाच्या विद्यार्थी विकास विभागाचे संचालक डॉ. आर. व्ही. गुरव म्हणाले, कलावंत विद्यार्थ्यांचा सांस्कृतिक, आर्थिक आणि सामाजिक विकास घडवून आणण्यासाठी विद्यापीठ वचनबद्ध आहे. विद्यापीठाचा राष्ट्रीय पातळीवर नावलौकिक होण्यासाठी युवा महोत्सवाचे आयोजन महत्त्वाचे आहे.

प्रमुख पाहुणे वाळवा येथील हुतात्मा उद्योग व शिक्षण समूहाचे अध्यक्ष वैभवकाका नायकवडी यांनी, त्यांच्या जडणघडणीमध्ये युवा महोत्सवाचा मोलाचा वाटा असल्याचे नमूद केले.

कार्यक्रमाचे अध्यक्ष श्री प्रिन्स शिवाजी बोर्डिंग हाऊसचे चेअरमन के. जी. पाटील म्हणाले, कॉलेजच्या सुवर्णमहोत्सवी वर्षानिमित्त विद्यापीठाने जिल्हास्तरीय युवा महोत्सव आयोजनाची संधी महाविद्यालयास देऊन यथोचित सन्मान केला आहे. प्रास्ताविक प्राचार्य डॉ. व्ही. एम. पाटील यांनी केले. उपप्राचार्य डॉ. ए. एम. शेख यांनी आभार मानले.

2 5 DEC 2021

सकाळ

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# तरुणाईच्या जल्लोषात युवा महोत्सव

## ५६ महाविद्यालयांतील ९४६ विद्यार्थ्यांचा सहभाग; अवतरली मराठी संस्कृती

**सकाळ वृत्तसेवा**

कोल्हापूर, ता. २४ : लोकनृत्यातून अवतरलेली मराठी संस्कृती, संगीतामधून उमटलेले भावबंध आणि नाटिकांमधून झालेले प्रबोधन अशा बहुरंगी सादरीकरणातून न्यू कॉलेजमध्ये जिल्हा युवा महोत्सव झाला. महोत्सवामध्ये जिल्ह्यातील ५६ महाविद्यालयातील ९४६ विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. कोरोना प्रतिबंधक उपाययोजनांची काटेकोर अंमलबजावणी करून हे सर्व कार्यक्रम घेतले.

महापालिका आयुक्त डॉ. कादंबरी बलकवडे यांच्याहस्ते महोत्सवाचे उद्‌घाटन करण्यात आले. हुतात्मा उद्योग व शिक्षण समूहाचे अध्यक्ष वैभव नायकवडी हे अध्यक्षस्थानी होते. प्रास्ताविक प्राचार्य डॉ. व्ही. एस. पाटील यांनी केले. डॉ. बलकवडे म्हणाल्या, 'महाविद्यालयीन जीवनात शैक्षणिक अभ्यासाबरोबरच कला, क्रीडा यामध्येही सहभागी होणे आवश्यक असते. यामुळे व्यक्तिमत्त्वाला पैलू पडतात. कला ही माणसाला उपजत मिळालेली देणगी असते मात्र आपल्यातील कलाकार ओळखून त्याचा विकास करावा लागतो. या सर्व दृष्टिकोनातून हे युवा महोत्सव अतिशय उपयुक्त असतात. त्यामुळेच विद्यार्थ्यांनी यामध्ये सहभाग घेतला पाहिजे.'

शिवाजी विद्यापीठाच्या विद्यार्थी विकास विभागाचे संचालक डॉ. आर. व्ही. गुरव म्हणाले, 'विद्यापीठातील कलावंत विद्यार्थ्यांना व्यासपीठ मिळवून देण्यासाठी असे महोत्सव आयोजित केले जातात. यातून कलासक्त मने घडतात.'




कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठ अंतर्गत जिल्हास्तरीय युवा महोत्सवात लोककला सादर करताना विद्यार्थी.
(मोहन मेस्त्री : सकाळ छायाचित्रसेवा)

युवा महोत्सवात विद्यार्थ्यांनी १४ कलाप्रकार सादर केले. यामध्ये नृत्य, गायन, नाटिका यांचा प्रामुख्याने समावेश होता. लोकनृत्यांनी कलाकारांनी महाराष्ट्राची बहुविध संस्कृती रंगमंचावर साकारली. ग्रामीणबाज असणाऱ्या या नृत्यातून मानवी जीवनाचे विविध कंगोरे उलगडले. नाटिकांमधून चपखलपणे समाजातील वास्तव मांडले. या नाटिकांनी मनोरंजनाबरोबरच प्रबोधनही केले. गायनातून न्यू कॉलेजमधील वातावरण भावविभोर झाले. हा महोत्सव चांगल्या पद्धतीने होण्यासाठी महाविद्यालयाचे प्राध्यापक आणि कर्मचाऱ्यांनी कष्ट घेतले. महाविद्यालयाच्या आवारात चार रंगमंच उभारले होते. श्री प्रिन्स शिवाजी बोर्डिंग हाऊसचे चेअरमन के. जी. पाटील, उपप्राचार्य टी. के. सरगर, डॉ. ए. एम. शेख यांच्यासह प्राध्यापक, कर्मचारी उपस्थित होते.

25 DEC 2021

तरुण भारत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# शिक्षणासोबत अंगभूत कलागुणांना वाव द्या

## प्रशासक डॉ. कादंबरी बलकवडे यांचे विद्यार्थ्यांना आवाहन : न्यू कॉलेजमध्ये युवामहोत्सव उत्साहात






**कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या ४१व्या युवामहोत्सवाचे उद्घाटन करताना प्रशासक डॉ. कादंबरी बलकवडे. सोबत के. जी. पाटील, वैभवकाका नायकवडी, आर. व्ही. गुरव, डॉ. व्ही. एम. पाटील व अन्य मान्यवर. दुसऱ्या छायाचित्रात शिवाजी पेठेतील न्यू कॉलेजमध्ये सहभागी युवतीच्या चमूने यल्लम्मादेवीच्या (रेणुका) जागर सादर करून उपस्थितीतांची मने जिंकली. (छाया : शशिकांत मोरे)**

प्रतिनिधी
कोल्हापूर

विद्यार्थ्यांच्या जडणघडणीमध्ये शैक्षणिक वाटचालीबरोबरच विविध सांस्कृतिक कलागुणांचा मोठा वाटा आहे. कलागुणांमुळे विद्यार्थी अभिरुची संपन्न होऊन त्याची सुजाण नागरिक बनण्याकडे वाटचाल सुरु होते. त्यामुळे विद्यार्थ्यांनी शैक्षणिक वाटचालीसोबत अंगभूत कलागुणांना वाव द्यावा, असे आवाहन प्रशासक डॉ. कादंबरी बलकवडे यांनी केले.

शिवाजी विद्यापीठाचा ४१ वा जिल्हास्तरीय युवामहोत्सव शिवाजी पेठेतील न्यू कॉलेजमध्ये झाला. महोत्सवाचे उद्घाटन महापालिकेच्या प्रशासक डॉ. कादंबरी बलकवडे यांच्याहस्ते झाले. याप्रसंगी त्या बोलत होत्या. अध्यक्षस्थानी प्रिन्स शिवाजी बोर्डिंग हाऊसचे चेअरमन के. जी. पाटील होते. हुतात्मा उद्योग व शिक्षण समूहाचे अध्यक्ष वैभवकाका नायकवडी प्रमुख उपस्थित होते.

डॉ. बलकवडे म्हणाल्या, कला ही माणसाला उपजत लाभलेली अमूल्य अशी देणगी आहे. माणूस आदीम काळापासून मुक्तपणे आपल्या कलागुणांची उधळण करीत आला आहे. कला कलावंताला सिद्ध करते, रसिकाला मंत्रमुग्ध करते. तसेच परस्परांमध्ये संघभावना वृद्धिंगत करुन एकमेकांच्या कलागुणांचा आदर करण्याचे संस्कार रुजवते. वैभवकाका नायकवडी यांनी माझ्या जडणघडणीमध्ये युवामहोत्सवाचा मोलाचा वाटा असल्याचे सांगितले. न्यू कॉलेजच्या सुवर्णमहोत्सवी वर्षानिमित्त शिवाजी विद्यापीठ प्रशासनाने युवामहोत्सवाच्या आयोजनाची संधी देवून संस्थेचा सन्मान केला असल्याचे प्रतिपादन प्रिन्स शिवाजी मराठा बोर्डिंग हाऊसचे चेअरमन के. जी. पाटील यांनी केले. स्वागत प्राचार्य डॉ. व्ही. एम. पाटील यांनी केले. उपप्राचार्य डॉ. ए. एम. शेख यांनी आभार मानले.

### महोत्सवामध्ये या कलांचे झाले सादरीकरण

महोत्सवामध्ये एकांकिका प्रकारात १० संघ, लोकसंगीत वाद्यवृंद ६, लोककला ११, लोकनृत्य १९, लघुनाटिका १२, मुकनाट्य १३, नकला १२, भारतीय समूहगीत १८, सुगमगायन कलाप्रकारात ३५ संघ सहभागी झाले होते.

### विद्यार्थ्यांकडून कलागुणांचे सादरीकरण

युवामहोत्सव विद्यार्थ्यांसाठी पर्वणी असते, याचा फायदा घेत महाविद्यालयीन विद्यार्थ्यांनी त्यांच्यामधील कलागुणांचे सादरीकरण केले. महोत्सवामध्ये ५६ महाविद्यालयातील ९४६ विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवला. विविध १४ कलाप्रकारांमध्ये त्यांनी त्यांच्यामधील कलागुणांचे सादरीकरण केले.

### लोकनृत्यांचा महोत्सवामध्ये उत्साह

सायंकाळी सादरीकरण झालेल्या लोकनृत्यांनी महोत्सवामध्ये उत्साह भरला. विविध लोकगीतांवर सहभागी झालेल्या १९ सघांनी नृत्याविष्कार सादर केला. तर या गीतांच्या तालावर उपस्थितांनीही ठेका धरला.

### न्यू कॉलेजचे नेटके नियोजन

कोरोना पार्श्वभूमीवर महोत्सवाचे न्यू कॉलेज प्रशासनाने नेटके नियोजन केले होते. गर्दी टाळण्यासाठी प्रत्येक कलाविष्काराच्या सादरीकरणाचे महाविद्यालयातील विविध विभागांमध्ये नियोजन केले होते. महोत्सवासाठी महाविद्यालयातील विद्यार्थी, संघप्रमुख, परीक्षक, विद्यार्थी विकास मंडळाचे ,अध्यक्ष, संस्थेचे चेअरमन, व्हाईस चेअरमन, संचालक, पदाधिकारी, प्राध्यापक, कर्मचारी यांनी विशेष परिश्रम घेतले.